# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/04/2023 (मंगळवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बसस्टॉप रामटेक येथे दिनांक ०३/०४/२०२३ चे ०२/०० वा. ते ०२/३० वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन आयसर ट्रक क्रमांक एम.एच.—३७/टि—३०१५ क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासले असता सदर वाहनात **आरोपी क्र. १) ज्ञानेश्वर मारोती सावळे, वय ३३ वर्ष, रा. हिंगरी ता. मगळुरपिर ता. वाशिम २) ज्ञानेश्वर काभुजी चौधरी, वय २७ वर्ष, रा. खरोला ता. जि. वाशिम ३) शोयेब अब्दुल सलाम, वय २८ वर्ष वार्ड क्र. ५ मगरुळपिर ४) मालक भागवत सकाराम रामजाळे, वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र सेलू बाजार मगरुळपिर जि. वाशिम** यांच्या ताब्यातुन पांढऱ्या रंगाचे १८ बैल आणि अशोक लेलॅन्ड एम.एच. —२८—बीबी—०९७२ मध्ये पांढऱ्या रंगाचे १८ बैल असे एकुण ३६ बैल (गोवंश) एकुण किंमती ७,२०,०००/—रु. चा अवैद्यरित्या विनापरवाना कोंबुन, निर्देयतेने वागणुक देवून पाण्याची व चाऱ्याची सोय न करता वाहतुक करतांनी मिळून आल्याने वरील दोन्ही ट्रक एकुण किंमती अंदाजे २६,००,०००/—रु व गोवंश असा एकुण वाहनासह ३३,२०,०००/—रुपयाचा मुद्देमाल आरोपी क्र. १ ते ४ यांचे कडून जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे— पोलीस शिपाई ओमप्रकाश तिरपुडे यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा १९६० सहकलम ५(१) (२), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सहकलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि योगेश भुर्रे ब. नं. ६७३ मो. क्र ७७२२००३६७३ हे करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. कन्हान — अंतर्गत १२ कि.मी अंतरावरील वार्ड नं १ डुमरी कन्हान येथे दिनांक ०२/०४/२०२३ चे २१/०० वा. ते दिनांक ०३/०४/२०२३ चे ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अभिमन दौलत डोंगरे, वय ६० वर्ष, रा. वार्ड नं १ डुमरी कन्हान ता. पारशिवनी याने खंडेरवार यांचे खाली प्लाटवर ठेवलेले गव्हाचे २२ कट्टे प्रत्येकी ६० किलो किंमती अंदाजे २४२००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोंराने चोंरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ जळते ब. नं. १३५ मों. नं ९६७३८३७००७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** – अंतर्गत गुमथळा शिवार कामठी येथे दिनांक ०२/०४/२०२३ चे १८.३० वा. ते दिनांक ०३/०४/२०२३ चे ०५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शैलेश वामन बोरकर रा. गुमथळा ता. कामठी जि. नागपुर याच्या शेतावरून पांढऱ्या रंगाचे दोन बैल किंमती अंदाजे प्रत्येकी २५,०००/–रू प्रमाणे ५०,०००/–रू लाल रंगाची गोरी किंमती अंदाजे १०,०००/– रू, काळया रंगाचा गोरा किंमती अंदाजे ५,०००/–रू, असा एकुण ६५,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जंगवाड ब. नं ११०२ मो. क्र. ८३२९९४८१०१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत मौजा सावळी शेत शिवार येथे दिनांक ०३/०४/२०२३ चे १०/३० वा. ते ११/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निखील जनार्दन भलमे, वय ३५ वर्ष, रा. आदर्श नगर नागपुर ह. मु. काटोल याला दि. ०३/०४/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा. कार्यालयात हजर असताना वरीष्ठ तंत्रज्ञ नामे– गणेश ऊईके यांचा फिर्यादीला फोन आला व त्यांनी सागितले की सावळी शिवारातील वडली फॉर्म चे मागीलबाजुचे लघु वाहिनीवरील न्युट्रल वायर सहा गाडयातील वायर चोरीला गेले आहे. तेव्हा फिर्यादीने लगेच सावळी शिवारातील वडली फॉर्म चे मागील बाजुचे लघु वाहिनी जवळ जावुन बघितले असता फिर्यादीला तेथील सहा गाडयातील न्युट्रल वायर ३६० मिटर किंमती अंदाजे १२२४०/– रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी देशमुख मो. नं. ९६६५६१५२९५ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ३५ किमी अंतरावर मौजा कळमना शिवार येथे दिनांक ०१/०४/२०२३ चे रात्री दरम्यान ते दिनांक ०२/०४/२०२३ चे ६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मण भास्कर घुगल, वय ३५ वर्ष, रा. उदय नगर सरस्वती रेसीडंसी प्लाट नं ७५ नागपूर जि. नागपुर याने आपले शेतात ११ क्विन्टल चना बाजार भाव किंमती प्रत्येकी क्विन्टल अंदाजे ४७००/–रू. एकुण किंमती ५१७००/–रूपयाचा मुद्देमाल हिरव्या दोरीने शिवून ठेवला होता. कोणीतरी अज्ञात चोराने मुद्देमाल चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ प्रमोद बन्सोड ब. नं. ४८५ पोस्टे कुही मो. नं. ९५११८१७१८९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**